महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ 922 /२०२२ दि. 29/१२/२०२२

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वागळे इस्टेट वाहतूक उपविभागाचे हद्दीत रोड नं. १६, रोड नं. २२, रोड नं. २८ येथे सरकारी व खाजगी कार्यालये, औद्योगिक कंपन्या आणि रोड नं. ३३ येथे नागरी वसाहत, गृहसंकुले आहेत. नमूद रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतूकीची वर्दळ होत असते. रस्त्याचे कडेला दुचाकी, चार चाकी वाहने अस्ताव्यस्तपणे उभी करण्यात येत असल्याने इतर वाहनांना वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील ठिकाणी **नो पार्किंग, पी–१ व पी–२ पार्किंग, समांतर (Parallel) पार्किंग** व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**१) नो पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :–**

| अ.क्र. | नो पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | मॉडेला चेकनाका ते महाराष्ट्र नगर | नो पार्किंग | २०० मीटर | २४ तास |
| २ | साऊथ कोस्ट हॉटेल ते रोड नं. १६ रस्त्याचे दोन्ही बाजूस | नो पार्किंग | २७० मीटर | २४ तास |
| ३ | एम्को कंपनी ते वागळे बस डेपो रस्त्याचे डाव्या बाजूस | नो पार्किंग | २३० मीटर | २४ तास |
| ४ | वागळे बस डेपो ते शाहीर अण्णाभाऊ साठे चौक दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस | नो पार्किंग | ३५० मीटर | २४ तास |
| ५ | ज्ञानेश्वर नगर ते राजमुद्रा सोसायटी रस्त्याचे दोन्ही बाजूस | नो पार्किंग | २५० मीटर | २४ तास |

**२) पी–१ व पी–२ पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :–**

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर |
|---|---|---|---|
| १ | लेकलर कंपनी ते MIDC ऑफिस रस्त्याचे उजव्या बाजूस | पी–१ | ३५० मीटर |
| २ | लेकलर कंपनी ते MIDC ऑफिस रस्त्याचे डाव्या बाजूस | पी–२ | ३५० मीटर |
| ३ | रोड नं. १६ ते स्टेट बँक ऑफ इंडिया रस्त्याचे डाव्या बाजूस | पी–१ | ४०० मीटर |
| ४ | रोड नं. १६ ते स्टेट बँक ऑफ इंडिया रस्त्याचे उजव्या बाजूस | पी–२ | ४०० मीटर |
| ५ | रोड नं. २२ येथील शंकर मंदिर ते ।T। सर्कल रस्त्याचे डाव्या बाजूस | पी–१ | ६५० मीटर |
| ६ | रोड नं. २२ येथील शंकर मंदिर ते ।T। सर्कल रस्त्याचे उजव्या बाजूस | पी–२ | ६५० मीटर |
| ७ | मराठा हॉटेल खानावळ ते ज्ञानेश्वर नगर रस्त्याचे डाव्या बाजूस | पी–१ | ४५० मीटर |
| ८ | मराठा हॉटेल खानावळ ते ज्ञानेश्वर नगर रस्त्याचे उजव्या बाजूस | पी–२ | ४५० मीटर |
| ९ | राजमुद्रा सोसायटी ते नितीन जंक्शन भुयारी मार्ग रस्त्याचे डाव्या बाजूस | पी–१ | ४०० मीटर |
| १० | राजमुद्रा सोसायटी ते नितीन जंक्शन भुयारी मार्ग रस्त्याचे उजव्या बाजूस | पी–२ | ४०० मीटर |
| ११ | रोड नं. २२ ते शाहीर अण्णाभाऊ साठे चौक रस्त्याचे डाव्या बाजूस | पी–१ | ७०० मीटर |
| १२ | रोड नं. २२ ते शाहीर अण्णाभाऊ साठे चौक रस्त्याचे उजव्या बाजूस | पी–२ | ७०० मीटर |

CamScanner

**३) समांतर (Parallel) पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :—**

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर |
|---|---|---|---|
| १ | ITI सर्कल ते एम्को कंपनी रस्त्याचे दोन्ही बाजूस | समांतर (Parallel) | ७५० मीटर |
| २ | साठेनगर ते इदिरानगर रस्त्याचे दोन्ही बाजूस | समांतर (Parallel) | ४५० मीटर |
| ३ | रहेजा सर्कल ते संकल्प चौक रस्त्याचे दोन्ही बाजूस | समांतर (Parallel) | ४५० मीटर |

**४) पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :—**

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर |
|---|---|---|---|
| १ | दत्त मंदिर ते ठाणे महानगरपालिका, वागळे ऑफिस | पार्किंग | २८० मीटर |

वर नमूद पार्किंगच्या ठिकाणी **नो पार्किंग, पी १ व पी २ पार्किंग, समांतर पार्किंग** व्यवस्थेबाबतची अधिसुचना लागू करण्यात येत आहे.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीकरीता :—**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई—विरार महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. ठाणेनगर, नौपाडा, कोपरी वाहतूक उप विभाग.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी.

CamScanner